## जाहीर नोटीस

मौजे चिखली येथील गट नं. ९६५ ते गट नं. १०२१

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते कि, मौजे चिखली येथील गट नं. ९६५ ते गट नं. १०२१ योजनेच्या अधिसुचनेच्या तळटिप क्र. ९ नुसार व मधिल १२.०० मी. रुंद रस्त्याची आखणी अंतिम मंजूर विकास योजनेच्या अधिसुचनेच्या तळटिप क्र. ९ नुसार व निश्चित करणे अंतर्गत पिंपरी चिंचवड मंजूर विकास नियंत्रण नियमावली मधिल नियम क्र. ६.६.२.१ (३) नुसार निश्चित करणे अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेनुसार दर्शविलेला १२ मी. रुंद रस्ता हा मौजे चिखली मधिल गट नं. ९६४, ९६५, ९६६, ९८८, ९८९, ९९१, ९९२, ९९३, ९९७, १००१, १००२, १००६, १००७, १००८, १००९, १०१०, १०१३, १०१४ व १०२१ या मिळकती मधून जात असून त्यामुळे वरिल मिळकतीचे विभाजन होते . त्यामुळे संबंधित जमीनमालकास विकसन करण्यामध्ये अडचणी निर्माण होत होत्या. तथापी मंजूर विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्त्यास समांतर सुमारे ६० ते ६५ मी. अंतरावर गट नं. च्या हद्दीवरुन जागेवरिल पानंदरस्ता असून सदरच्या रस्त्याचा वापरच वाहतुकीचा रस्ता म्हणून होत असल्याने सदरचा पानंद रस्ता मंजूर विकास नियंत्रण नियमावली मधिल नियम क्र. ६.६.२.१ (३) नुसार विकास योजना रस्ता म्हणून निश्चित करणेची मागणी स्थानिक जमीनमालकांनी केलेली आहे.

यामध्ये मौजे चिखली मधिल गट नं. ९६४, ९६५, ९६६, ९८८, ९८९, ९९१, ९९२, ९९३, ९९७, १००१, १००२, १००६, १००७, १००८, १००९, १०१०, १०१३, १०१४ व १०२१ ह्या गटा सोबत गट नं. ९२३, ९२४, ९२५, ९२६ व ९२७ बाधित होत आहेत.

त्यास अनुसरुन आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयामध्ये सोमवार दिनांक ०८/०७/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदरच्या सुनावणीस संबंधित जमीनमालकांनी उपस्थित रहावे. सदरच्या सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास वरिल प्रमाणे कार्यवाही करणेस आपली हरकत नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण:- पिंपरी, पुणे

दिनांक: २८/०६/२०१८

जाहिरात क्रमांक ३५६

उपसंचालक, नगररचना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे – ४११०१८